FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154182

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. २२, वर्ष Year २०२२, दिनांक Date 04/08/2022

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections 7, १२
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from १५/०२/२२, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to ०४/०८/२२ वेळ Time १८:०० वा.
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १८/०२/२०२२, वेळ Time १५:००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 06/२२, तारीख Date ०५/०८/२०२२ वेळ Time 06:30

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name के/पूर्व (स्लम) यांचे कार्यालय, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward के/पूर्व विभाग, रस्त्याचे नाव Name of road चौथा मजला
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बृहन्मुंबई महानगरपालिका, गाव Village, पोस्ट Post, गुंदवली, तालुका Taluka, आझाद रोड, जिल्हा Dist., अंधेरी (पू) राज्य State मुंबई.
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name पांडुरंग हरीभाऊ पाटोळे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name हरीभाऊ पाटोळे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ७० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9004066157
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation रिक्षा चालक
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : तरुण मित्र मंडळ चाळ, गल्ली / सर्व्हे नं. Ward, घर / नाव नं. House/Name No. आझाद नगर मरोळ, फोन / मो. नं. Phone/Mo. No. हनुमान मंदीर, पॅन नं. PAN No. जवळ, वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road अंधेरी (पूर्व), जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मुंबई - ४०००५९, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   (१) राजेंद्र सटवा नाईक वय ५४ वर्षे धंदा-नोकरी (भाडे संकलक) के/पूर्व (स्लम) यांचे कार्यालय, के/पूर्व विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका, गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई-५९, रा.ठी-: प्रमेय सोसायटी, रूम नं ७०१, प्रमेय कॉलनी बोर रोड, गोरेगाव (पू) मुंबई. (२) मोहन रावजी ठिक, वय 54 वर्षे, धंदा-नोकरी (कामगार) रा.ठी- एकता बिल्डींग रुम नं 501, मंडोली चर्च मागे, सिझर रोड, अंधेरी (प), मुंबई, कार्यालयाचा पत्ता - वरीलप्रमाणे

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

12.022

वरील फिर्यादी पांडुरंग हरिभाऊ पाटोळे वय 70 वर्षे रा.ठि.- तरुण मित्र मंडळ चाळ, सागबाग मरोळ, हनुमान मंदिराजवळ, अंधेरी (पूर्व) मुंबई-400059 यांचा स्वतंत्र कागदावर नोंदवण्यात आलेली फिर्याद हिच गुन्ह्याची प्रथम खबर अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(प्रविण पांडुरंग वनगोसावी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
वरळी, मुंबई

(पांडुरंग हरिभाऊ पाटोळे)

Scanned with CamScanner

दिनांक–०५/०४/२०२२.

फिर्याद

श्री. पांडुरंग हरीभाऊ पाटोळे, वय ७१ वर्षे, धंदा–नोकरी ( रिक्षा चालक), पत्ता– तरूण मित्र मंडळ चाळ, सागबाग मरोळ, हनुमान मंदिराजवळ, अंधेरी पुर्व, मुंबई ५९, मोबाईल नं.९००४०६६१५७.

---

मी वरीलप्रमाणे असून नमुद पत्त्यावर मी माझे जन्मापासुन राहत असुन सद्या माझे कुटूंबासह वास्तव्यास आहे. मी रिक्षा चालक असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. माझे घराला लागुनच माझे 'पारस इंटरप्रायझेस' नावाचे दुकान असुन तेथे माझी विवाहीत मुलगी नामे ज्योती लोंढे ही रेल्वे बस टिकीट बुकींगची तसेच युनियन बँकेचे ग्राहक सेवा केन्द्रमार्फत पैसे ट्रान्सफर करण्याची कामे करते.

माझे घर माझी पत्नी सौ. शंकुतला पांडुरंग पाटोळे हिच्या नावे असुन नमुद दुकान माझे नावे आहे. सदर दुकान मी सन १९८५ मध्ये एसआयएमधुन रितसर फी भरून माझे नावे कमर्शिअल करून घेतले होते. त्यानंतर मी माझे माहितीकरीता सन २०२० मध्ये के/पुर्व विभाग, मुंबई महानगरपालिका, अंधेरी येथुन एनेक्चर –२ काढले, त्यामध्ये मला माझे नावे दुकानाची नोंद दिसुन आली नाही.

तत्पुर्वी माझी पत्नी श्रीमती शंकुतला पांडुरंग पाटोळे हिने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या सागबाग स्नेहनगर एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ठ –२ मध्ये नाव समाविष्टकरणेकरीता प्रकल्प अधिकारी (वसाहत), के/पुर्व, बीएमसी यांचे कार्यालय, अंधेरी येथे अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने माझे पत्नीस दिनांक ०१/१२/२०२१ रोजी सुनावणी कामी प्रकल्प अधिकारी (वसा), के/पुर्व यांनी बोलावले होते. सदर सुनावणीच्या वेळेस तिचेसोबत मी देखील उपस्थित होतो. त्यावेळी प्रकल्प अधिकारी श्री. जाधव यांचे समक्ष सुनावणीझाल्यानंतर त्यांनी माझे कागदपत्रांची पाहणी करून माझे पत्नीने केलेल्या अपीलप्रमाणे कार्यवाही करीत असल्याचे आम्हास सांगितले होते.

त्यानंतर सदर कार्यालयातील राजेंद्र नाईक, भाडे संकलक यांनी मला नमुद अपीलाच्या ऑडरची कॉपी घेण्याकरीता १५ दिवसांनी बोलावले. त्यानंतर मी १५ दिवसांनी ऑर्डरची कॉपी घेण्याकरीता मनपा के/पुर्व विभाग, अंधेरी, मुंबई येथे गेलो व प्रकल्प अधिकारी श्री. जाधव यांना भेटलो, त्यांनी त्यांचे कार्यालयातील नाईक यांना भेटण्यासाठी सांगितले. त्यावेळी नाईक यांनी मला पुन्हा येण्यासाठी सांगितले. त्यानंतर मी नाईक यांना वांरवार भेटलो पण त्यांनी अपीलाच्या ऑर्डरची कॉपी मला दिली नाही.

त्यादरम्यान मी माझे दुकानासंदर्भात एसआरए योजनेत व्यवसायीक दुकानाची नोंद पुर्वरत करण्याकरीता दुकानाची कागदपत्र जोडुन दिनांक ०६/०१/२०२२ रोजी अंधेरी के/पुर्व विभाग, मनपा कार्यालय, अंधेरी, मुंबई येथे अर्ज केला होता. त्यानंतर दिनांक १७/०२/२०२२ रोजी मी ऑडरची कॉपी घेण्याकरीता के/पुर्व विभाग, अंधेरी, मुंबई येथे जावुन नाईक यांना भेटलो असता, त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तुमची अपील अमान्य केली आहे. त्यानंतर त्यांनी माझी ऑर्डरच्या कॉपीवर सही घेतली परंतु ऑर्डरची कॉपी मला दिली नाही. त्यावर नाईक मला बोलले की, ''माझे पत्नीच्या घरासंदर्भातील अपीलाबाबत ऑर्डर बदलुन देणेकरीता व माझे दुकानाची नोंद पुर्वरत करावयाची असेल तर ३ लाख दयावे लागतील'' अशी माझेकडे रू. ३,००,०००/– (अक्षरी तीन लाख फक्त) इतक्या लाचेची मागणी केली.

सदरची लाचेची रक्कम मला दयावयाची इच्छा नसल्याने मी दि. १८/०२/२०२२ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे नाईक यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली. त्यानंतर पो. नि. प्रविण बनगोसावी यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती सांगुन शनिवार व रविवार शासकीय सुट्टी असल्याने सदरची कारवाई दि. २१/०२/२०२२ रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे मी दि. २१/०२/२०२२ रोजी सकाळी ११.४५ वाजतामीलाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पो.नि. प्रविण बनगोसावीयांनी पोलीस पथकातील स.पो.आ. सुहास देशमुख, व दोन सरकारी पंच व पोलीस पथकाची माझेशी ओळख करुन दिली.

Scanned with CamScanner

त्यानंतर पो.नि. प्रविण बनगोसावी यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या मजल्यावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. बनगोसावी व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पो.नि. बनगोसावी, स.पो.आ. देशमुख, दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळाकारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालय के/पुर्व मनपा विभाग,अंधेरीच्या दिशेने गेलो. के/पुर्व विभाग, मनपा, अंधेरी, मुंबईच्या अगोदर काही अंतरावर गेल्यावर पो.नि. बनगोसावी यांनी मला योग्य त्या सुचना देवून पो.नि. बनगोसावी यांनीडिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टाच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी,व पंच श्री. रविकिरण सोनकांबळेअसे लोकसेवकास भेटण्यासाठीके/पुर्व विभाग, मनपा, अंधेरी, मुंबई कार्यालयातील चौथ्या मजल्यावरील प्रकल्प अधिकारी (स्लम) यांचे कार्यालय, के/पुर्व विभाग, मनपा, अंधेरी, मुंबई येथे जावुन लोकसेवक नाईक यांची भेट घेतली असता, लोकसेवक नाईक यांनी मला बघितल्यावर 'बोला पाटोळे साहेब' अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना 'आपण बोलले होते ना सोमवारी या' असे म्हणालो. त्यानंतर लोकसेवक नाईक यांनी 'थांबा सांगतो बघुन' असे बोलले. त्यानंतर मी व लोकसेवक नाईक यांच्यामध्ये माझे घरासंदर्भात व दुकानाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी लोकसेवक नाईक यांना 'तुम्ही त्यादिवशी बोलली गोष्ट मला मान्य आहे' असे म्हणालो असता, त्यावर लोकसेवक नाईक यांनी 'तुम्हाला जमणार आहे का' अशी मला विचारणा केली, त्यावर मी त्यांना 'हो जमवतो ..दोन दिवस दया मला' असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक श्री. नाईक यांनी मला सांगितले की, 'तुमचं कमिर्शिअल झाल्याशिवाय मी तुमचं रेसिडेन्शल पात्रच करणार नाही.' त्यावेळी मी लोकसेवक नाईक यांना 'तीन लाख दिल्यावर होईल ना काम' असे विचारल्यावर लोकसेवक नाईक यांनी माझेसोबत असलेल्या पंच श्री. सोनकांबळे यांचेबाबत 'हे कोण आहेत' अशी विचारणा केली, त्यावर मी लोकसेवक नाईक यांना 'ते बाजुवाला असल्याचे सांगुन कलेक्टर ऑफिसला गेलो होतो'' असे त्यांना सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. नाईक यांनी पंच श्री. सोनकांबळे यांना बाहेर थांबण्यास सांगितल्याने पंच सोनकांबळे हे उठुन कार्यालयाच्या बाहेर जावुन थांबले. त्यानंतर माझे प्रलंबित कामासंदर्भात मी व लोकसेवक नाईक यांनी चर्चा केली. तसेच माझे पत्नीने केलेल्या अपीलसंदर्भात लोकसेवक नाईक यांनी विचारणा केली. तसेच माझे दुकानाच्या भरलेले भाडेसंदर्भात चौकशी करून त्यांचे वेगळे भाडे भरावे लागेल असे सांगुन 'मला तुमची सर्व ऑर्डर बदलावी लागेल' असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक नाईक यांनी मला राणे साहेबांशी बोलुन घेतो, त्याच्यात काय होत आम्हालाच काही मिळत नाही असे बोलले. त्यावेळी मी लोकसेवक नाईक यांना 'पैसे कुठे देवु' असे विचारले असता, तीन पर्यत असे म्हणाले, त्यावर मी तीनच्या वर नका जावु आपली ताकद नाही तितकी असे म्हणालो, त्यावर लोकसेवक नाईक यांनी 'उदया आणा' असे बोलुन 'कधी जमेल तुम्हाला' असे विचारले. त्यावर मी दोन तीन दिवस लागतील असे बोललो. त्यानंतर लोकसेवक नाईक व मी पुन्हा माझे दुकान व घरासंदर्भात कागदपत्रांची पाहणी करत चर्चा केली. त्यानंतर मी लोकसेवक नाईक यांना आता एवढे कलेक्टर बिलेक्टर संगळ केलंय आता उखरू नका तुम्ही काहीच ... काय ते बोला ..तेवढं पुर्ण करा... तुम्ही बोला ना तीन.... ठिक आहे चला... उदया आणु का असे विचारले असता, लोकसेवक नाईक यांनी परवा असे बोलुन 'बाकी कोणाला सांगु नका... तीन मध्ये काम केल म्हणुन' असे बोलुन लोकसेवक नाईक यांनी माझेकडे तीन लाख रूपये इतकी लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच श्री. सोनकांबळे असे पोलीस पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. बनगोसावी यांनी माझे

जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझेव लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याची ट्रान्सक्रिप्ट तयार करून यातील लोकसेवक श्री. नाईक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेचे सांगुन पुढील सापळा कारवाई करण्याची तजविज ठेवण्यात आलेली असल्याचे सांगितले व त्यादिवशीची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. प्रविण बनगोसावी यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दिनांक २१/०२/२०२२ रोजीच्या पडताळणीच्या कारवाईच्या दरम्यान लोकसेवक नाईक यांनी माझेकडे रूपये ३ लाख इतक्या लाचेची मागणी करून दोन दिवसांनी नमुद लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले होते. परंतु दिनांक २३/०२/२०२२ रोजी सकाळीच यातील लोकसेवक नाईक हे माझे घरी आले व त्यांनी ते स्वत:हुन पाच/सहा दिवसांनी कॉलकरून मला बोलाविणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे पुढील सापळा कारवाई करता आली नव्हती. त्यानंतर बरेच दिवस झाले तरी नमुद लोकसेवकाचा मला कॉल न आल्याने दिनांक ०७/०३/२०२२ रोजी मला ब्युरो कार्यालयात बोलावुन यातील लोकसेवक नाईक यांना फोनकरून त्यांची भेट घेण्याचे सर्वानुमते ठरविले असल्याचे पो.नि. बनगोसावी यांनी सांगितले.

त्याप्रमाणे दि. ०७/०३/२०२२ रोजी मी ११:३० वा. मी लाचलुपचत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर झालो.पो.नि. बनगोसावी यांना भेटलो त्यानंतर यातील लोकसेवक नाईक यांना फोनकरून त्यांची समक्ष भेट घेवुन पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेले तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. बनगोसावी व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी माझा मोबाईल क्र. ९००४०६६१५८ वरुन लोकसेवक जाधव यांचे मोबाईल क्र.८३५५८७३२८५ वर कॉल केला असता लोकसेवक नाईक यांनी 'नंतर करा ना फोन संध्याकाळी ....साडे चार पाच करा असे बोलले. त्यामुळे मी व सापळा पथक ब्युरो कार्यालयातच थांबुन राहीलो. त्यानंतर पुन्हा ०४:३० ते ०५:३० वाचे दरम्यान लोकसेवक नाईक यांना चार कॉल केल असता, लोकसेवक नाईक यांना फोन बंद असल्याचे समजले. त्यानंतर सदरची कारवाई स्थगीत केल्याचे पो.नि. बनगोसावी यांनी सांगितले. सदर बाबत पो.नि. बनगोसावी यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर लोकसेवक नाईक यांच्याकडुन कोणत्याही प्रकारे संपर्क होत नसल्याने दिनांक १५/०३/२०२२ रोजी लोकसेवक नाईक यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जावुन लोकसेवक नाईक कार्यालयात हजर आहेत किंवा कसे यांची खात्री करून लोकसेवक नाईक हे कार्यालयात हजर असल्यास त्यांची प्रत्यक्ष भेट घेवुन माझे प्रलंबित कामासंदर्भात चर्चा करून लोकसेवकाने लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केल्यास त्यांना वेळ मागुन घ्यावी व लगेच शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे मला सांगितले.

त्याप्रमाणे दि. १५/०३/२०२२ रोजी १४:५० वा. पो.नि. बनगोसावी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी अंधेरी मेट्रो स्टेशन ब्रीजचे खाली हजर झालो. त्यावेळी पो.नि. बनगोसावी हे स.पो.आ. देशमुख, दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनांमधुन तेथे आले. त्यावेळी पो.नि. बनगोसावी यांनी मला योग्य त्या सुचना देवून शासकीय वाहनातच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. बनगोसावी व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी पंच सोनकांबळे यांचेसोबत लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. मी, व पंच श्री. सोनकांबळे असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो असता, लोकसेवक नाईक हे या आठवडयात तेथे नसल्याचे इतर लोकसेवकश्री. मोहन याने सांगितले. त्यानंतर

Scanned with CamScanner

मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. बनगोसावी यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व इतर लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याची ट्रान्सक्रिप्ट तयार करून त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. बनगोसावी यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यादरम्यान दिनांक ३१/०३/२०२२ रोजी लोकसेवक नाईक यांच्या कार्यालयातील लोकसेवक शिपाई मोहन याने त्यांचा मोबाईलवरून माझे मोबाईलवर संपर्क करून लोकसेवक नाईक साहेबांनी मला सोमवारी दिनांक ०४/०४/२००० पाच – साडे पाच वाजता भेटण्यास बोलाविले असल्याने आज दिनांक ०४/०४/२०२२ रोजी सापळा पुर्व /सापळा पंचनाम कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच मला येथे यापुर्वी पडताळचीवेळीचे थांबल्या ठिकाणी पश्चिम द्रुतगती महामार्गावर अंधेरी फ्लायओव्हर ब्रिजच्या खाली, अंधेरी पुर्व मुंबई येथे परस्पर येणार असुन आपणांस पथकासह सदर ठिकाणी जायचे असल्याचे सांगितले .

त्याप्रमाणे दि. ०४/०४/२०२२ रोजी १६:३० वा. पो.नि. बनगोसावी हे स.पो.आ. देशमुख, दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनांमधुन तेथे आले व मला अंधेरी फ्लायओवर ब्रीजच्या खाली पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ बोलाविले. त्यानुसार मी सदर ठिकाणी हजर झालो. त्यावेळी पोनि बनगोसावी यांनी पुढील सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी शासकीय वाहातच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. बनगोसावी व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी तेथे उपस्थीत असलेले पोलीस अंमलदार यांची ओळख स.फौ.चालक श्री. जामसांडेकर अशी करुन दिली. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला लोकसेवक नाईक यांना दयावयाचे रु. ३,००,०००/– ( अक्षरी रु. तीन लाख ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता,एवढी रक्कम माझ्याकडे नसल्याचे त्यांना सांगितले व मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. २०००/– दराच्या ०२ नोटा,व भारतीय चलनाच्या रू.५००/– दराच्या ८२ नोटा असे एकुण रु. ४५,०००/– (अक्षरी रु. पंच्चेचाळीस हजार) पो.नि. बनगोसावी यांचेकडे दिले.

त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी त्यांचेकडे रू.२०००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रु. १,९६,०००/– (अक्षरी एक लाख शहाण्णव हजार फक्त) एकुण ९८ टॉय नोटा तसेच रू ५००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रू.५९,०००/–(अक्षरी एकोणसाठ हजार फक्त) एकुण ११८ टॉय नोटा असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि बनगोसावी यांनीलोकसेवक नाईक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांचा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे मला सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांचे सुचनेनुसार तेथे हजर असलेले स.फौ.चालक जामसांडेकर यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम तीन बंडल करून अनुक्रमे.......

१) २,००,०००/–( रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा व ९८ टॉय नोटा )

२) ५०,०००/–( रु. ५००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या ४१ नोटा व ५९ टॉय नोटा ) व

Scanned with CamScanner

३) ५०,०००/—(रु. ५००/— किमतीच्या भारतीय चलनाच्या ४१ नोटा व ५९ टॉय नोटा ) अशा पध्दतीने ठेवली. त्यानंतर सदरचे तीन पैशांची बंडल स.फौ. चालक जामसांडेकर यांनी अलगदपणे माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेवली व त्यानंतर ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मी, दोन सरकारी पंच, पो.नि. बनगोसावी, स.पो.आ. देशमुख व सापळा पथक असे शासकीय वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालय के/पुर्व मनपा विभाग,अंधेरीच्या दिशेने गेलो. के/पुर्व विभाग, मनपा, अंधेरी, मुंबईच्या अगोदर काही अंतरावर गेल्यावर रमेश मोरे गार्डनच्या बाजुस थांबलो. त्यानंतर पो. नि. बनगोसावी यांनी मला योग्यत्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी, व पंच श्री. सोनकांबळे असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. व सापळा कारवाईतील पथक लोकसेवक यांचे कार्यालयाचे आजुबाजुचे परीसरात कोणसही संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन राहीले. मी के/पुर्व विभाग, अंधेरी मनपा कार्यालयाच्या चौथ्या मजल्यावरील रूम नं. ४०३, प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयातील लोकसेवक नाईक यांची भेट घेतली त्यावेळी लोकसेवक नाईक यांनी लोकसेवक मोहन ठिक यांना बोलावुन माझे कामाची फाईलबाबत विचारणा केली. त्यावेळी पंच सोनकांबळे नमुद रूम नं. ४०३ च्या बाहेर दरवाज्याजवळ ते दिसतील अशा स्थितीत उभे होते. त्यानंतर लोकसेवक नाईक यांनी लोकसेवक मोहन यांस ' मोहन शेठ हयाच्याकडुन जरा ते घ्या' असे बोलुन लाचेची रक्कम लोकसेवक मोहन यांचेकडे देण्यास सांगितले. त्यानंतर मला बाजुस असलेल्या श्री. गो. ब. गावडे, वसाहत अधिकारी, के/पुर्व (स्लम) असा बोर्ड असलेल्या कॅबिनमध्ये घेवुन गेले. त्यावेळी कॅबिनमध्ये कोणीही नव्हते. सदरवेळी मी माझे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रूपये ३,००,०००/— उजव्या हाताने काढुन लोकसेवक मोहन ठिक यांचे समोर धरली असता, ती त्याने दोन्ही हाताने स्विकारून त्यांचेकडील पिवळया रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवली. त्यानंतर मी सदर कॅबिनच्या बाहेर आलो व लागलीच नमुद रूम नं. ४०३ च्या बाहेर येवुन मी लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारलेबाबत माझा डावा हात डोक्यावरून फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला असता, सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारानी लोकसेवक राजेंद्र नाईक व लोकसेवक मोहन ठिक यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

लोकसेवक नाईक यांनी माझे पत्नीच्या घरासंदर्भातील अपीलाबाबत ऑर्डर बदलुन देणेकरीता व माझे दुकानाची नोंद पुर्वरत करण्याकरीता रु. ३,००,०००/— ( अक्षरी रु. तीन लाख फक्त) ची लाचेची मागणी करुन ती लोकसेवक मोहन यांस देण्यास सांगुन ती लोकसेवक मोहन यांनी स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक राजेद्र नाईक व लोकसेवक मोहन ठिक त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक राजेंद्र नाईक व लोकसेवक मोहन ठिक यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहीली असता माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रविण बनगोसावी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ............ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ............ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ............ —

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ............ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वाजूस नमूद वेळी व ठिकाणी मातील आरोपी लोकसेवक राजेंद्र नाईक यांनी फिर्यादी यांचेकडे त्यांचे नावे असलेल्या दुकानाची चुकलेली नोंद पूर्ववत करणे व फिर्यादी यांचे पत्नीच्या नावे असलेल्या घराचे (झोपडपट्टी पूर्नवसन संदर्भात) अमान्य केलेली ऑर्डर बदलून देणेकामी फिर्यादी यांचेकडे रुपये 3,00,000/- लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक राजेंद्र नाईक यांनी सांगितलेवरुन आरोपी लोकसेवक मोहन ठिक यांनी स्विकारली म्हणून आरोपी लोकसेवक राजेंद्र नाईक व आरोपी लोकसेवक मोहन ठिक यांना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

13\. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

प्रविण पांडुरंग वानगोमावी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............

District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature]

14\. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रविण पांडुरंग वानगोमावी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ............

Posting

Code No. of I. O. ............

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............

1\. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner